ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ९ डिसेंबर, १९५९ | अंक ४५

## विविध माहिती

**मराठवाड्यांतील शिक्षण**—मराठवाड्यांतील ग्रामीण भागांतून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मुंबई सरकारनें एकच मास्तर असलेल्या शाळा खेडेगांवांतून स्थापन करण्याचें ठरविलें आहे. मराठवाड्यांतील ५ जिल्ह्यांतून ६३० शिक्षकांच्या जागा नव्यानें निर्माण करण्यांत आल्या आहेत. शाळा नसलेल्या बहुतेक खेड्यांतून आतां अशा प्राथमिक शाळा निघतील.

**जामनगर भागांत ट्यूब वेल्स**—मध्यवर्ती सरकारच्या ट्यूब वेल्स संघटनेनें जामनगर भागांत २० ट्यूब वेल्स खोदण्याचें ठरविलें आहे. संघटनेच्या प्रमुख एंजिनिअरनें जामनगर भागाला भेट देऊन विहिरींच्या जागा निश्चित केल्या आहेत. ह्या विहिरी पूर्ण झाल्यावर सौराष्ट्राच्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील ५० विहिरी खोदण्यांत येणार आहेत.

**साखरेवरील नियंत्रणें काढून टाका**—बंगालच्या साखर व्यापारी असोसिएशननें मध्यवर्ती सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं, साखरेवरील नियंत्रणें संपूर्णपणें रद्द करण्यांत यावींत आणि निदान तीन महिन्यांसाठी तरी दरमहा १,८५,००० टन साखर विक्रीसाठी खुली करावी. ह्या उपायानें साखरेच्या किंमती चढणार नाहींत असें असोसिएशनचें म्हणणें आहे.

**पहिलें अणुशक्ति केंद्र**—अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें भारतामधील पहिलें केंद्र अहमदाबाद येथें स्थापन केलें जाण्याची बरीच शक्यता आहे. अहमदाबाद व त्याच्या आसपासच्या भागांत असलेल्या कारखान्यांकडून विजेच्या औद्योगिक शक्तीची मागणी मोठ्या प्रमाणावर येण्याची बरीच शक्यता आहे. म्हणून अहमदाबादची निवड होईल, असें म्हणतात.

**जुन्या पुस्तकाची किंमत**—सेंट जॉन ह्या संताच्या चरित्राच्या एका जुन्या हस्तलिखितासाठी एका अमेरिकन गिऱ्हाइकानें ६५,००० पौंड किंमत दिली. अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका पुस्तकासाठी ह्याच गिऱ्हाइकानें गेल्या वर्षी ३९,००० पौंड किंमत दिली होती. हस्तलिखित पुस्तकांत इतकें सुंदर व सचित्र पुस्तक जगांत नाहीं, असें म्हणतात. हा सौदा लंडनमध्यें पटविण्यांत आला.

**मूल पळविण्याचा हेतू**—दिल्लीमधील एका प्रसूतिगृहांतून एका बाईनें दुसऱ्या बाईचें मूल पळविलें. बाईचा शोध करून पोलिसांनीं तें मूल खऱ्या आईच्या स्वाधीन केलें. मूल पळविणारी बाई आपल्या जबानींत म्हणाली कीं मूल झालें नाहीं तर दुसरें लग्न करण्याची धमकी आपल्या नवऱ्यानें दिली होती. म्हणून इस्पितळांत शिरून व गरोदरपणाचें सोंग घेऊन गुन्हा करावा लागला.

**कातडीचें कलम करणारा डॉक्टर**—कातडीचें कलम करणारे प्रसिद्ध ब्रिटिश शस्त्रवैद्य मि. हॅरोल्ड गिलीज हे भारताच्या तीन महिन्यांच्या दौऱ्यावर आले आहेत. भारत सरकारच्या आमंत्रणावरून ते कांहीं प्रमुख शहरांना भेटी देतील. माणसाच्या शरीरावर नवी कातडी बसविण्याच्या शस्त्रक्रियेचे जनक म्हणून ते ओळखले जातात. मुंबईला ह्या प्रकारच्या शस्त्रक्रियेचें जें केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे, त्याला ते मार्गदर्शन करतील.

**झेकोस्लोव्हाकिआचे व्यापारी प्रतिनिधी**—झेकोस्लोव्हाकिआच्या दहा व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ भारतांत आलें आहे. भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्य करण्यासाठी तें मध्यवर्ती सरकारशीं चर्चा करणार आहे. झेकोस्लोव्हाकिआकडून भारताला दीर्घ मुदतीचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे.

**अंड्यांच्या निर्यातीनें प्राप्ति**—चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांच्या काळांत भारतानें सुमारें २० लाख रु. किंमतीचीं अंडीं निर्यात केलीं. १९५८ सालीं भारतामधून ३२ लाख रुपयांचीं अंडीं निर्यात करण्यांत आलीं होतीं. भारताकडून अंडीं घेणाऱ्या देशांत सीलोनला बरेंच महत्त्वाचें स्थान आहे.

**अध्यक्ष आयसेनहोअर ह्यांना भेट**—दिल्ली येथें भरणाऱ्या शेती प्रदर्शनाला प्रे. आयसेनहोअर भेट देतील त्यावेळीं आंध्र प्रदेशातर्फे त्यांना एका बैलाची भेट देण्यांत येणार आहे. ह्या बैलाची जात आंध्र प्रदेशांत आतां फार कमी प्रमाणांत आढळून येते. हा बळू दिल्लीच्या प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहे.

**दिल्ली शहराचा पाणीपुरवठा**—दिल्ली शहराला पाण्याचा पुरवठा अधिक प्रमाणांत करतां यावा म्हणून बांधलेल्या वझिराबाद धरणाचें काम पूर्ण झालें आहे. ह्या धरणामुळें पाण्याच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणें शक्य होईल. दिल्ली शहराला ह्यापूर्वी रोज ६ कोटीच गॅलन पाणी पुरविणें शक्य होतें. पण आतां रोज ९ कोटी गॅलन पाणी पुरवितां येईल.

**पाकिस्तानचा ताग**—पाकिस्तानमधील ताग भारताला घेणें कितपत शक्य होईल तें पहाण्यासाठी पाकिस्तान सरकारचें प्रतिनिधि मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. भारतानें पाकिस्तानकडून अधिक प्रमाणांत ताग विकत घ्यावा; त्यामुळें भारताला सध्यांच्या अन्नटंचाईच्या दिवसांत धान्य पिकविण्यास अधिक जमीन मिळेल असें पाकिस्तानचें म्हणणें आहे.

### ला. इं. कॉर्पोरेशनची गुंतवणूक

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें ४२७ कोटी रु. ची गुंतवणूक केलेली आहे. त्याची फोड अशी:—४८% मध्यवर्ती सरकारी कर्जरोखे; १३·५% राज्य सरकारांचे कर्जरोखे; १·८% विदेशी सरकारांचे कर्जरोखे; १०·३% सरकारी हमीचे रोखे; १८% प्रेफरन्स शेअर्स, डिबेंचर्स, ऑर्डिनरी शेअर्स; २·९% गहाणावर.

### एव्हरेस्टवर भारतीयांची स्वारी

मौंट एव्हरेस्टवर स्वारी करण्यासाठी भारतीयांची एक तुकडी १९६० मध्यें जाणार आहे. त्याच्या खर्चासाठी भारत सरकारनें ६ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकी २,४६,१८५ रु. आतांपर्यंत खर्च झाले आहेत.

### सुएझ कालवा सुधारण्यासाठी कर्ज

सुएझचा कालवा खोल व रुंद करण्यासाठी जागतिक बँकेनें इजिप्तला ५ कोटी, ६० लक्ष डॉलर्सचें कर्ज देण्यास मान्यता दिली आहे. जागतिक बँकेकडून आणखीहि कर्जे मिळण्याची इजिप्तला खात्री वाटत आहे.

### ज्यूट देऊन घड्याळें, सायकली घेणार

पाकिस्तान रशियाला ४ लक्ष रु. किमतीचे ज्यूट देऊन त्यांच्या मोबदल्यांत घड्याळें व सायकली घेणार आहे. ह्या संबंधांतील करारावर नुकत्याच उभय देशांच्या सह्या झाल्या.

### वाढदिवसाच्या केकमध्यें १२० देशांतले जिन्नस

सर विन्स्टन चर्चिल हे ३० नोव्हेंबर रोजीं ८५ वर्षांचे झाले. त्या दिवशीं झालेल्या मेजवानीसाठी तयार केलेल्या केकमध्यें १२० देशांतून आलेले जिन्नस घातले होते. त्यांत पनामा कालव्याच्या पाण्याचा (डिस्टिल केलेल्या) एक थेंबहि होता.

### १८ कोटी रु. वार्षिक उत्पन्नाचे ४६,००० ट्रस्ट

बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० सालीं चॅरिटी कमिशनर-कडे वार्षिक १७,९४,०६,६४८ रुपये उत्पन्नाचे ४६,००० पब्लिक ट्रस्ट नोंदलेले आहेत. त्यांपैकी १४,२८७ ट्रस्ट देवळांचे; ९,१३७ इतर धार्मिक संस्थांचे व ७,१८१ जातीय संस्थांचे आहेत. गेल्या पांच वर्षांत सरकारला त्यांचेकडून ४४,०३,४११ रु. वर्गणी मिळाली; खर्च २५,०१,५१७ रु. झाला.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

(शिड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन ६५६३)

अध्यक्ष
श्री. छोटालाल डी. जोशी

मुंबई शाखा:—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन २५३४०८)

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५६,००,०००

★ चालू खातें व्याज ½ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ९ डिसेंबर, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनमध्यें बेकायदा प्रवेश करणारे हिंदी लोक

कांहीं दिवसांपूर्वी ब्रिटनमध्यें बेकायदा प्रवेश करणाऱ्या ५२ हिंदी नागरिकांना सक्तीनें भारतांत परत आणण्यांत आलें. अशा प्रकारें ब्रिटनमध्यें प्रवेश मिळविणाऱ्या लोकांमुळें ब्रिटनमधील अधिकारी बरेच त्रासून गेले होते. तसें म्हटलें तर कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील कोणत्याहि नागरिकांना ब्रिटनमध्यें जाऊन कामधंदा करून राहण्याचा हक्क आहे. पण हा प्रश्न केवळ कायद्याच्या कक्षेंतील नाहीं; त्याला कांहीं सामाजिक व आर्थिक बाजूहि आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, ब्रिटनमध्यें अशा रीतीनें प्रवेश करणारे हिंदी नागरिक कांहीं विशेष लायकीचे असतात असें नाहीं. पुष्कळदां त्यांना इंग्रजीसुद्धां येत नसतें, किंवा एखाद्या व्यवसायाचें शिक्षणहि झालेलें नसतें. तथापि, युद्धोत्तर कालांतील भरभराटीचा फायदा घेऊन ब्रिटनमधील गिरण्यांतून व कारखान्यांतून बिगरकसबी कामें ह्या लोकांनीं मिळविलेलीं आहेत. त्यांच्यापैकीं कित्येक जणांनीं आठवड्याला १० ते १२ पौंडांची कमाई केली. इंग्लिश लोकांच्या राहणीच्या मानानें काटकसरीनें राहून पैशाची बचत केली आणि आपल्या नातलगांना व मित्रांना ब्रिटनमध्यें आणलें. ब्रिटनमधील बऱ्याच शहरांतून भारतीय व पाकिस्तानी नागरिकांच्या अशा वसाहतीच स्थापन झालेल्या आहेत. त्यांचीं छोटीं छोटीं दुकानें व रेस्टॉरंटस् चांगलीं चाललेलीं आहेत. हे नागरिक वर्तणुकीनें चांगले असतात. तेव्हां त्यांच्या ब्रिटनमधील स्थायी वास्तव्यांत कांहीं आक्षेपार्ह असें म्हणतां येत नाहीं. पण ह्या विषयाला एक आर्थिक बाजू आहे आणि ती जराशी बोचक आहे. एखादा उद्योगधंदा मंदींत सांपडला तर पहिली गदा येते ती परदेशी कामगारांवर. कारण, गोऱ्या कामगाराला कामावरून आधी काढण्याची सोयच नसते.

ते बेकार झाले तरी त्यांना बेकारीभत्ता व इतर मदत मिळूं शकते. पण अशा प्रकारें बरेच परदेशीय नागरिक सार्वजनिक पैशांवर जगत आहेत असें लोकांना समजलें कीं असंतोषाचा प्रादुर्भाव होतो. दुसरें असें कीं, बेकायदा प्रवेश करणारे बहुतेक नागरिक मोठ्या शहरांतील दारिद्र्यग्रस्त भागांत दाटीवाटीनें राहात असतात. अशा परिस्थितींत वांशिक दंगेधोपे झाले तर त्यांत कांहींच नवल नाहीं. अजून ह्या दंग्यांची झळ भारतीय व पाकिस्तानी नागरिकांना लागलेली नाहीं. ब्रिटनमधील गौरेतर कामगारांत सर्वांत अधिक संख्या वेस्ट इंडीजमधील निग्रो कामगारांची आहे. पण भारतामधून अगर पाकिस्तानांतून खोट्या पासपोर्टच्या साह्यानें आलेल्या नागरिकांच्या प्रश्नाकडे ब्रिटिश पार्लमेंटला लक्ष घालावें लागणार असें दिसत आहे. निरक्षर व दरिद्री नागरिकांनीं ब्रिटनमध्यें जाऊन भारताचें नांव बद्दू करूं नये म्हणून भारत सरकार अशा परदेशगमनाला मुळींच उत्तेजन देत नाहीं. पण अज्ञानी व गरीब लोकांना खोटीं आमिषें दाखवून व खोटे पासपोर्ट देऊन फसविणाऱ्या टोळ्याच अस्तित्वांत आलेल्या आहेत. त्यामुळें रीतसर खरा पासपोर्ट घेऊन जाणारे नागरिक व खोट्या कागदपत्रांच्या साह्यानें जाणारे नागरिक, ह्यांची गल्लत झाली आहे, व एकूण संख्या भलतीच वाढली आहे. अशा टोळ्या मुख्यतः पंजाब व दिल्ली राज्यांत आहेत आणि फसलेले बहुतेक लोक शीख शेतकरी आहेत. खोटे पासपोर्ट व इतर कागदपत्र ह्यांची अधिकाऱ्यांनीं फारशी कडक तपासणी करूं नये म्हणूनहि ह्या टोळ्या चोख व्यवस्था करतात. आपलें घरदार विकून ४ हजारांपासून १० हजारांपर्यंत रकमा देऊन कित्येकांनीं खोटे पासपोर्ट मिळविलेले आढळून आलें आहे.

## पे कमिशनच्या अहवालाचे दूरगामी परिणाम

मध्यवर्ती सरकारनें आपल्या नौकरवर्गाच्या पगारासंबंधीं कमिशन नेमलें होतें, त्या कमिशनच्या बऱ्याचशा शिफारसी सरकारनें मान्य केल्या आहेत. सरकारनें घेतलेल्या निर्णयामुळें होणारे आर्थिक परिणाम दूरगामी ठरण्याचा संभव आहे. पुढील पंधरा वर्षांच्या कालांत सरकारच्या निर्णयाचे परिणाम कमी-अधिक प्रमाणांत स्पष्ट होत जातील. सध्यां सरकारला साल १८ कोटी रुपयांचा बोजा सहन करावा लागणार आहे. शिवाय देशाच्या संरक्षणदळाच्या बाबतींतहि कांहीं शिफारशी अमलांत आणावयाच्या असल्यामुळें नव्या बोजाची रक्कम कांहीं कोटींनीं अधिक होणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मध्यवर्ती सरकारच्या नौकरांना व संरक्षणदलांतील नौकरांना पगारवाढ देण्यांत आल्यामुळें १२० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. मध्यवर्ती सरकारच्या नौकरांना वेतनवाढ देण्यांत आल्यामुळें राज्यसरकारचा नौकरवर्ग, आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा नौकरवर्गहि वेतनश्रेणींत वाढ करण्याच्या मागण्या करूं लागण्याचा संभव आहे. १९५७ सालच्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं १४ राज्य सरकारें मिळून २० लाखांवर लोकांना रोजगार देतात; स्थानिक स्वराज्य संस्था १६ लाख लोक कामावर ठेवतात. ह्याशिवाय सरकारची मदत घेणाऱ्या संस्थांतून ५ लाख लोक काम करीत आहेत. मध्यवर्ती सरकारचे नौकर आणि राज्यसरकारांचे नौकर ह्यांच्या वेतनश्रेणींत व इतर सोयी-सवलतींत फार फरक असणें इष्ट ठरणार नाहीं. राज्य सरकारांना आपल्या नौकरांना अधिक वेतन द्यावें लागल्यास तीं सरकारें मध्यवर्ती सरकारकडे मागण्या करतील. पण वेतनश्रेणींच्या सुधारणेमुळें होणारा नवा खर्च राज्यांनींच केला पाहिजे, असें, मध्यवर्ती अर्थमंत्र्यांचें मत आहे.

## सिमेंटच्या विक्रीच्या किंमती

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन पोत्यांत भरलेल्या सिमेंटची नजिकच्या रेल्वे स्टेशनच्या ठिकाणीं दर टनास ११७.५० रुपये या एकाच किंमतीनें विक्री करीत असतें. या किंमतींत अबकारी कर, पॅकिंग व वाहतुकीची आकारणी, विक्री कर व इतर आकार यांचा समावेश होतो. कॉर्पोरेशनला या व्यवहारांत दर टनामागें फक्त ६० नये पैसे उत्पन्न मिळतें.

## परदेशीय भांडवलासंबंधींच्या धोरणाचा खुलासा

भारताचे परदेशांतील कमिशनर-जनरल म्हणून श्री. बी. के. नेहरू काम करीत असतात. परदेशांतून भारताला कोणत्या प्रकारची व किती आर्थिक मदत मिळूं शकेल ह्यासंबंधीं माहिती मिळविण्याचें कार्य त्यांच्याकडे आहे. अमेरिकेंतील इन्व्हेस्टमेंट बँकर्स असोसिएशन ह्या संस्थेसाठी त्यांनीं तयार केलेल्या पत्रकांत परदेशीय भांडवलासंबंधीं भारत सरकारच्या धोरणाचा खुलासा केला आहे. श्री. नेहरू ह्या पत्रकांत म्हणतात कीं, भारताला आपला औद्योगिक विकास साधण्यासाठीं परदेशीय चलनाची गरज आहे ही गोष्ट खरी. पण ह्याचा अर्थ असा नव्हे कीं परदेशीय भांडवलाची सर्व गरज परदेशाकडून भागविली जाण्याची अपेक्षा भारत करीत आहे. खाजगी मालकीचें अमेरिकन भांडवल भारताला मोठ्या प्रमाणावर मिळूं शकलें तर परदेशीय चलनाच्या गरजेपैकी बरीच मोठी गरज भागविली जाईल. म्हणूनच खाजगी मालकीचें अमेरिकन भांडवल आकर्षित करण्यासाठी शक्य सर्व ते उपाय भारत सरकार योजीत आहे. अशा भांडवलाला योग्य तें वातावरण व परिस्थिति लाभावी म्हणूनहि सरकार खटपट करीत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचें ध्येय ठरलेलें आहे. विकासाच्या एकापुढील एक पायऱ्या स्वतःच्या बळावर व स्वतःच्या साधनसंपत्तीच्या साह्यानें चढता याव्या अशारीतीनें विकासाच्या योजना आंखण्यांत येत आहेत. विकासाच्या योजनांच्या मार्गांत भांडवलाचा तुटवडा हें कारण प्रमुख आहे. पण त्याचबरोबर स्थिर स्वरूपाचें सरकार, कार्यक्षम व प्रामाणिक नोकरवर्ग, तांत्रिक व संघटना कौशल्य, ह्यांचीहि आवश्यकता असते. भांडवल सोडून इतर सर्व गोष्टींची सिद्धता भारताजवळ आहे हें गेल्या दहा वर्षांत स्पष्ट झालें आहे.

## सहकारी कर्जातील धोका सरकारनें पत्करावा

म्हैसूर राज्याच्या केंद्रीय सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. ए. सी. नरसिंह रेड्डी, ह्यांनीं बंगलोर येथें राज्यांच्या केंद्रीय सहकारी बँकांची परिषद बोलाविली होती. वैकुंठभाई मेहता कमिटीला उत्तरें धाडण्यापूर्वी ही बैठक भरविण्यांत आल्यामुळें त्यासंबंधीं चर्चा व निर्णय होणें योग्यच होतें. शेतकऱ्यांना भांडवली मदत करण्याच्या नव्या कार्यक्रमांतील धोका मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं पत्करावा, असें परिषदेनें सुचविलें. दिलेल्या एकूण कर्जाच्या १५% रक्कम 'बॅड डेट रिझर्व्ह फंड' म्हणून राखून ठेवण्यांत यावी, अशी परिषदेची शिफारस आहे. जिल्हा बँकांच्या कर्ज देण्याच्या मर्यादा १२ पटीऐवजीं २० पट असाव्यात आणि प्राथमिक सहकारी सोसायट्यांच्या बाबतींत त्या ८ पटीऐवजी १५ पट असाव्यात, असेंहि ह्या प्रातिनिधिक परिषदेनें सुचविलें आहे. मध्यम मुदतीच्या कर्जाची मुदत ३ वर्षांची ५ वर्षें करण्यांत यावी; विशेषतः जमीनसुधारणा, विहिरी खणणें, पंप बसविणें, इत्यादिसाठी दिलेल्या कर्जाची मुदत अवश्यमेव वाढवावी, असा परिषदेचा आग्रह आहे. रिझर्व्ह बँकेनें मध्यम मुदतीच्या कर्जविषयक अटी ढिल्या कराव्या; ह्या कर्जाचें सहकारी संस्थांच्या स्वतःच्या भांडवलाशीं कांहीं प्रमाण असण्याची आवश्यकता परिषदेला वाटत नाहीं; वेगवेगळ्या विभागांच्या गरजांवरूनच मर्यादा ठरविल्या जाव्या. सरकारनें सहकारी संस्थांचें भाग-भांडवल खरेदी करून त्यांच्यांत भागीदार होणें, परिषदेला इष्टच वाटतें. सेवा सहकारी संस्थांच्या द्वारांच अन्नतुटवड्याचा प्रश्न सुटूं शकेल, असें मत परिषदेनें व्यक्त केलें.

## गंज चढूं नये म्हणून १५० कोटी रु. खर्च !

लोखंडी व पोलादी सामानावर गंज चढूं नये म्हणून १९६०-६१ मध्यें भारतांत सुमारें १५० कोटी रु खर्ची पडतील असा अंदाज कराईकुडी येथील मध्यवर्ती विद्युत्रासायनिक संशोधन संस्थेनें केला आहे. मध्यवर्ती शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळाच्या 'विज्ञान-प्रगति' या मासिकाच्या अग्रहायण महिन्याच्या अंकांतील एका लेखांत वरील माहिती दिलेली आहे. देशांतील पोलादाचें उत्पादन वाढत असल्याकारणानें, गंज चढूं नये म्हणून वापराव्या लागणाऱ्या पदार्थांवरील खर्चहि वाढणार आहे. या अंदाजे १५० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रु. लोखंडी व पोलादी सामानाला रंग देण्यावर, वार्निशें व इतर रोगणें लावण्यावर आणि तांब्याचे व त्याच्या मिश्र धातूंचे गंज-प्रतिबंधक थर देण्यावर खर्ची पडतील. याखेरीज जस्ताचा थर देणें, कल्हई करणें, निकल, शिसें किंवा त्यांच्या मिश्रधातूंचे थर देणें, इत्यादि साहित्याचाहि गंज-संरक्षक म्हणून उपयोग करण्यांत येत असतो.

## मेंथॉलच्या झाडांची लागवड

पेपरमिंट तेल ज्यापासून निघतें, त्या मेंथॉल झाडांची लागवड काश्मीरमध्यें मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्या जपानी जातीच्या झाडांची लागवड कोइमतूर येथें प्रयोगादाखल करून पाहण्यांत आली असून ती यशस्वी झाली आहे. प्रयोगशाळेंत त्यापासून तेल काढण्याचे प्रयोगहि उत्तेजनकारक आहेत; तेव्हां थोड्या मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यांत येणार आहे. पेपरमिंट तेलाचें जागतिक वार्षिक उत्पादन २२·५ लक्ष पौंड असून त्यापैकी ६०% उत्पादन एकट्या जपानमध्यें होतें. भारतांत दरसाल लागणारें सुमारें १० ते १५ लक्ष रुपयांचें पेपरमिंट तेल मुख्यतः अमेरिका, चीन व जपान येथून आयात होतें. आयातीवरील निर्बंधामुळें, मेंथॉलची युद्धपूर्व किंमत ६ ते १० रु. होती, ती आतां ४० ते ६० रुपयांवर गेली आहे. त्यामुळें मेंथॉल देणाऱ्या झाडांच्या लागवडीकडे अधिक लक्ष जाऊं लागलें आहे.

## टाटा व इंडियन आयर्न कंपन्यांच्या कर्जावर ५% व्याज

टाटा आणि इंडियन आयर्न अँड स्टील कंपन्या यांना दिलेल्या खास कर्जावर १ जुलै, १९५८ पासून दरसाल दरशेंकडा ५ टक्के दरानें व्याज आकारण्याचा निर्णय टॅरिफ कमिशनच्या शिफारशीवरून भारत सरकारनें घेतला आहे.

**रस्ते बांधण्याच्या कामीं मदत**—नेपाळचा पूर्व भाग व पश्चिम भाग ह्यांना जोडणारा एक रस्ता बांधण्याच्या कामीं रशिआ नेपाळला मदत करणार आहे. रस्त्याच्या बांधकामासंबंधीं प्राथमिक पहाणी करण्याचें काम सोव्हिएट तज्ज्ञांनीं नुकतेंच सुरू केलें आहे. सध्यां पूर्व व पश्चिम भागांतील वाहतूक भारतीय प्रदेशांतून गेल्याशिवाय करतां येत नाहीं.

**कॉर्पोरेटर्सचा भत्ता बेकायदा**—दिल्ली कॉर्पोरेशनच्या कॉर्पोरेटर्सना निरनिराळ्या समितींच्या बैठकीच्या वेळीं ते हजर राहिल्यास १५ रुपये भत्ता घेण्यास हरकत नाहीं. पण असा भत्ता दररोज घेतां येणार नाहीं असा निर्णय मध्यवर्ती सरकारच्या कायदाखात्यानें दिला आहे. रोजच्या भत्त्याबद्दल ऑडिटरनें आक्षेप घेतला होता.

## पेटंट कचेरीचा वार्षिक अहवाल

### पेटंटासाठी अनेक अर्ज: कित्येक क्षेत्रांत भारतीय शोध

१९५८ मध्यें, निरनिराळ्या क्षेत्रांतील ५२९ भारतीय शोधांना पेटंटें मिळण्याबद्दल पेटंट कचेरीकडे अर्ज करण्यांत आले होते असें त्या कचेरीच्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें.

परदेशांतून आलेल्या अर्जांसुद्धां पेटंटसाठी आलेले एकूण अर्ज ३,५७२ होते. यांपैकी ६०२ अर्ज भारतांतीलच होते, परंतु त्यांपैकी वर उल्लेख केलेले ५२९ भारतांनीं लावलेल्या शोधांबद्दलचे होते. भारतांतील अर्जांपैकीं ७५ टक्क्यांहून अधिक अर्ज मुंबई, पश्चिम बंगाल व दिल्ली या प्रदेशांतून व ठिकाणाहून आलेले होते. लावण्यांत आलेलें शोध मुख्यत्वें उद्योगधंदे आणि तंत्रविद्या या क्षेत्रांतील होते.

मागील वर्षाप्रमाणेंच भारतीय अर्जांपैकीं बहुतेक अर्ज कापडाच्या डिझाइनविषयींचे होते. एकूण अर्जांपैकीं ४० टक्के अर्ज रासायनिक उद्योगधंद्यांसंबंधीं असून सेंद्रिय रासायनिक औद्योगिक उद्योगधंद्याचा विचार करतां रंग आणि रंगपदार्थ आणि कृत्रिम औषधें या बाबतींत लावलेल्या शोधांसाठीं पेटंटें मागण्यांत आलीं होतीं.

भारतीयांनीं लावलेले शोध मुख्यत्वें मध्यवर्ती शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळामार्फत आलेले होते. त्यामध्यें डिस्टिलरीमध्यें वाया जाणाऱ्या पदार्थांपासून यीस्टचें उत्पादन, कापड तयार करण्याच्या कामांत वापरण्यासाठी सल्फोनेटेड सॅफ्लोअर ऑईल, कापूर तयार करणें, काजूच्या बीच्या सालीपासून, राळीचें उत्पादन इत्यादि शोध होते. यासेरीज धान्यपदार्थ नेण्यासाठी डबे, मिठाई, बीयांची पेरणी, नांगर, थाळीचा नांगर, यासारखीं कांहीं अवजारें तसेंच खाद्यपदार्थ टिकविणें, तेल व चरबी काढणें, साखर तयार करणें व शुद्ध करणें, कापणीचीं व लावणीचीं यंत्रें, धान्य आणि बियाणें यांच्यावर योग्य ते संस्कार करणें, इत्यादिसंबंधांत भारतीयांनीं लावलेल्या शोधांबद्दल पेटंटे मागण्यांत आलीं होतीं.

सूर्यशक्तीचा उपयोग करणें, कांहीं प्रकारचे पंप, भारतीय भाषांसाठी योग्य असे टाइपरायटर, वॉटरकुलर, पंखे, इत्यादि क्षेत्रांतहि भारतीयांनीं कांहीं शोध लावल्याचें या अर्जांवरून दिसून आलें. तसेंच इलेक्ट्रिक वॉटर हीटर, ए. सी. फॅन मोटर्स आणि टेलिफोन सेटस् यांमध्येंहि भारतीय संशोधकांनीं लक्ष घातलें होतें.

शिवणाचीं यंत्रें, बॉबीन्स, चरखे, सिगारेट तयार करण्याचीं यंत्रें, आलोक यंत्रें, जाहिरात करण्याचीं कांहीं साधनें, व्हल्कनायझिंग प्रोसेसिस, माल चढवियाची, उतरविण्याचीं, वर उचलण्याचीं आणि नेण्याचीं यंत्रें यासारख्या आणखी कांहीं क्षेत्रांतहि भारतीयांनीं शोध लावलेले होते.

पेटंट खात्याचें १९५८ चें उत्पन्न आणि खर्च अनुक्रमें ९.८१ लाख व ६ लाख रु. होता.

## सन १९५८–५९ मध्यें ५.५ कोटी रुपये किंमतीच्या लोकरी मालाची निर्यात

भारतांतून १९५८–५९ मध्यें ५.५ कोटी रुपये किंमतीचा लोकरी माल व वस्तू निर्यात करण्यांत आल्या. १९५६–५७ आणि १९५७–५८ मध्यें अनुक्रमें ४.४ व ४.८ कोटी रुपयांचा लोकरीचा माल व वस्तू निर्यात झाल्या होत्या.

गालिचे आणि जमिनीवर अंथरावयाचे रग यांसारख्या अगदीं प्राचीन काळापासून भारतांतून निर्यात होणाऱ्या मालाबरोबरच, पश्चिम आणि आग्नेय आशियांतील निरनिराळ्या देशांकडे लोकरीचें कापड आणि होजियरी माल पाठविण्यास भारतानें सुरुवात केली आहे. भारतीय लोकरीच्या कापडाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी लोकर धंद्याच्या विकास-मंडळानें तपशीलवार योजना आंखली आहे.

सन १९५८–५९ मध्यें लोकरी आणि वर्स्टेड कपड्यांच्या निर्यातीपासून ५० लक्ष रुपये मिळाले. मध्यपूर्वेतील देशांकडे विशेषतः पोस्टानें पार्सलें पाठवून दर वर्षी १ कोटी रुपये किंमतीचा लोकरी होजियरी माल निर्यात करतां येईल असा अंदाज आहे. १९५८–५९ मध्यें ४.५ कोटी रुपये किंमतींचे गालिचे व जमिनीवर अंथरावयाचे रग निर्यात करण्यांत आले. ही निर्यात प्रामुख्यानें इंग्लंड, अमेरिका, कानडा व ऑस्ट्रेलिआ या देशांकडे झाली.

लोकरी आणि वर्स्टेड कापडाच्या उत्पादनांतहि सतत वाढ होत असून पहिल्या योजनेच्या अखेरीस (१९५५) हें उत्पादन १४.९६ दशलक्ष वार होतें, तें १९५८ मध्यें १९.१ दशलक्ष वारांवर गेलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठी २ कोटी वारांचें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे.

लोकरी माल व वस्तू याशिवाय आणखी, भारतांतून दर वर्षी सरासरी ३ ते ३.५ कोटी रत्तल कच्ची लोकर निर्यात होते व त्यामुळें भारताला ८ ते १० कोटी रुपये किंमतीचें परकीय चलन मिळतें. इंग्लंड हें भारतीय लोकरीचें प्रमुख गिऱ्हाइक असून एकूण निर्यातीपैकी ५० टक्के निर्यात इंग्लंडकडे केली जाते. त्यानंतर अमेरिकेचा क्रम लागत असून तिकडे ३० टक्के लोकर निर्यात होते.

**अबूच्या पहाडाचा विकास**—अबूच्या पहाडाचा विकास करून तें ठिकाण हौशी प्रवाशांच्या दृष्टीनें अधिक आकर्षक करण्याची योजना आखण्यांत आली आहे. राजस्थानमधील एकमेव थंड हवेचें ठिकाण म्हणून अबू प्रसिद्ध आहे. दिलवाडा येथील सुप्रसिद्ध जैन मंदिरें अबूच्या पहाडावरच वसलेलीं आहेत.

**पांढऱ्या रंगाचा वाघ**—दिल्ली येथें भरविण्यांत यावयाच्या जागतिक शेती प्रदर्शनांत पांढऱ्या अंगाचा व काळे पट्टे असणारा एक वाघ ठेवण्यांत येणार आहे. हा वाघ रेवाच्या महाराजांच्या मालकीचा आहे. वाघाची ही जात दुर्मिळ असून रेव्याच्या आसपासच्या दाट जंगलांतच त्याचा थोडाबहुत आढळ होतो.

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

### बनावट पासपोर्टचा 'धंदा' बसला

जालंदरचा गेल्या कित्येक वर्षांतला तेजीमध्यें असलेला, बनावट पासपोर्ट तयार करून विकण्याचा धंदा आतां बंद पडला आहे. कारण, बनावट पासपोर्टच्या आधारें परदेशी जाणारांची भारत सरकारनें नाकेबंदी केली आहे. जालंदर जिल्ह्याची लोकसंख्या १२ लक्ष सुद्धां नाहीं, पण तेथें २० ट्रॅव्हल एजन्सीज् आहेत; किरकोळ ट्रॅव्हल एजंट आणखी आहेत, ते वेगळेच. खोट्या पासपोर्टचे आधारें परदेशीं गेलेल्या ५२ हिंदी उतारूंना नुकतेंच परत भारतांत धाडण्यांत आलें, त्यांपैकी ४८ जालंदर मधले होते! जालंदरमधील लोक धाडसी असून, ते जगांत कोठेंहि जाण्यास तयार असतात. तेथून ते नातेवाइकांना पैसे पाठवतात, दानधर्म करतात; इथल्या वधूंना परदेशांत मागणी असते, एकेकाळीं, जालंदरमध्यें अशा रीतीनें परदेशांतून पांच कोटी रुपयांची आवक होत असे, असें म्हणतात. ह्या भरभराटीच्या धंद्यास आतां आळा बसणार आहे.

---

### पुणें सें. को. बँक लि.

यंदा सुरवातीसच, ३०-८-५८ रोजीं, बँकेची खेड तालुक्यांतील चाकण येथील उपशाखा बँकेचे अध्यक्ष श्री. य. बा. सावंत, इनामदार, यांच्या हस्तें सुरू झाली. म्हणजे, आतां बँकेच्या मुख्य कचेरीशिवाय १४ शाखा व ६ उपशाखा चालू आहेत. बँकेचें वसूल भांडवल २३,१३,२९० रु. आहे. त्यांपैकी १० लक्ष रुपयांचे भाग मुंबई राज्य सहकारी बँकेनें घेतलेले आहेत. शेतकी सोसायट्यांना भाग भांडवल म्हणून देण्यासाठी मुंबई राज्य सहकारी बँकेकडून ४,१८,२०० रु. मिळालेले आहेत. बँकेची गंगाजळी व इतर निधि ह्यांत १४,७१,७९० रु. आहेत. रिझर्व्ह बँकेकडून ४९,८०,००० रु. कर्ज घेतलेलें आहे. एकूण ठेवींची रक्कम २,४५,२९,१८२ रु. आहे. अहवालाचे वर्षी शेती-कर्जाचे पोटीं १,१७,७४,३१२ रु. येणें असून थकबाकीचें प्रमाण १८.२% आहे. बटाटा कर्जयोजनेप्रमाणें १२,६५,६८२ रु. येणें असून थकबाकीचें प्रमाण ७.३% आहे. पीक कर्जयोजनेची अंमलबजावणी अधिक कार्यक्षम व्हावी व प्रत्येक पिकास पुरेसें कर्ज मिळून शेतकऱ्यांचा फायदा व्हावा, ह्यासाठी प्रत्येक पिकासाठी ठरवून दिलेले एकरीं दर बँकेनें १-६-५९ पासून वाढविले आहेत. उसासाठी १,३०० रु., १,००० रु. व ८०० रु. असे तीन प्रकारचे दर आहेत. उन्हाळी बटाट्यासाठी ८०० रु., जपानी भातशेतीसाठी १२५ रु., केळ्यांना ७०० रु. व कांद्यांसाठी २०० रु. आहेत; जिराईत गहूं-ज्वारी-बाजरीसाठी कमींत कमी दर २५ रु. आहे. पीक कर्ज शक्य तेवढें मालाच्या स्वरूपांत, तेंहि सहकारी खरेदी-विक्री संघांमार्फत देण्याचें धोरण बँक कसोशीनें अंमलांत आणीत आहे. माळेगांव व सणसर ह्या जिल्ह्यांतील दोन सहकारी कारखान्यांकडील क्रेडिट्सची बाकी ६५,४१,५३५ रु. आहे. वैयक्तिक कर्जांची येणें बाकी ११,९०,४५५ रु. आहे. यंदापासून बँक घरतारणावर कर्जें देत नाहीं; इतर वैयक्तिक कर्जांतहि क्रमशः कपात करण्याचें बँकेचें धोरण आहे. वैयक्तिक कर्जांची थकबाकी ३३.३% आहे. बँकेस २,५७,१८४ रु. निव्वळ नफा झाला. ५% डिव्हिडंडला १,१०,००० रु. लागतील. संचालक मंडळानें सुचविलेल्या वांटणींत १०,००१ रु. शिवस्मारक निधीस देणगीसाठी आहेत.

---


स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :
पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

| | | ३० जून, १९५९ अखेर |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७२,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३.०० | रु. ३.२५ | रु. ३.५० | रु. ४.०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.
दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २.०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २.५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०.५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

---

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें
गो. गं. साठे, मॅनेजर

# विदेश-यात्रेची पूर्वतयारी

## आर्थिक व राजकीय मंजुऱ्या आणि परवाने

[ श्री. महेन्द्र राजा, एम्. ए. (लंडन) ]

( मागील अंकावरून समाप्त )

### सी. आय. डी. अधिकाऱ्याचा रिपोर्ट

पुढें आपल्या अर्जाच्या दोन प्रतींपैकी एक डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयांतून रिजनल पासपोर्ट ऑफिसरकडे पाठविण्यांत येते व दुसरी प्रत आपल्या राहत्या शहरांतील सी. आय. डी. च्या सर्वोच्च अधिकाऱ्याकडे. अर्थात् हें काम किती वेगानें होईल तें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या सेक्रेटरीवर अवलंबून असतें; वाटल्यास तो त्याच दिवशीं तें मार्गाला लावतो; नाहींतर ते कागद महिनाभर त्याच्या फाइलमध्येंच पडून राहतात. यावर उपाय हाच कीं, या सेक्रेटरींना मधून मधून भेटून आपलें काम करवून घ्यावें. अर्जाची एक प्रत सी. आय. डी. कार्यालयाकडे पाठविली गेल्याची निश्चित बातमी लागतांच ती तेथून तेथील सर्व कार्यभाग आटोपून, परत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयाकडे शक्य तितक्या लौकर पाठविण्याच्या प्रयत्नास लागावें. कारण जोपर्यंत आपल्या अर्जाची दुसरी प्रत सी. आय. डी. च्या रिपोर्टबरोबर रिजनल पासपोर्ट ऑफिसरकडे पोहोंचत नाहीं तोंपर्यंत त्या कार्यालयांत अर्जाच्या पहिल्या प्रतीवर कांहींच विचार केला जाणार नाहीं. सी. आय. डी. ऑफिसमध्यें सुद्धां महिना महिना फाइल जेथल्या तेथेंच पडून राहण्याची शक्यता असते. वास्तविक डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयांतून त्यांना पत्रद्वारें कळविलेलें असतें कीं, अर्ज एका आठवड्याच्या आंत आपल्या रिपोर्टसह परत पाठवावा; परंतु या ना त्या कारणानें उशीर होतोच. तेव्हां एका आठवड्याच्या आंत सी. आय. डी. चा एखादा माणूस आपल्याकडे चौकशीकरितां न आला वा आपणाला त्याच्या कार्यालयांत हजर होण्याची सूचना मिळाली नाहीं तर आपणच त्यांच्या कार्यालयांत जाऊन आपला अर्ज त्यांच्याकडे चौकशीकरितां आला किंवा नाहीं याबद्दल तपास करावा. सी. आय. डी. चा रिपोर्ट जितका लौकर जाईल तितक्या लौकर पासपोर्ट आपल्या हातीं पडण्यास मदत होईल.

सी. आय. डी. चा रिपोर्ट डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे परत गेल्यानंतर पुन्हां डि. मॅजिस्ट्रेटच्या सेक्रेटरीला भेटून आपल्या अर्जाची दुसरी प्रत पासपोर्ट-ऑफिसरकडे लौकर पाठविली जाण्याच्या हेतूनें प्रयत्न करावे. एवढें काम झालें, कीं जवळजवळ महिनाभर कांहीं हालचाल करण्याची आवश्यकता नसते. एक महिन्याच्या आंतच पासपोर्ट-ऑफिसरकडून आपणाला कांहीं ना कांहीं उत्तर येतेंच, न आल्यास मात्र "रिप्लाय पेड" तार करून "आम्हांला पासपोर्ट लवकर पाहिजे, तो केव्हां मिळेल" अशा स्वरूपाची चौकशी करावी. पासपोर्ट-ऑफिसरकडे नेहमींच तारेनें व्यवहार ठेवावा; कारण तेथें साध्या पत्रांची दखलच घेतली जात नाहीं. पत्रच पाठवावयाचें झाल्यास रजिस्टर्ड पाठवावें. तार करूनहि उत्तर न आल्यास एक आठवड्यानें पुनः तार पाठवावी. याप्रमाणें एकसारखें मागें लागलात तरच कांहीं ना कांहीं उत्तर मिळेल; या उत्तरानुसार पुढें काय तें करावें.

### पासपोर्टची मुदत

पासपोर्टची मुदत ५ वर्षांची असते; तेव्हां तो लौकर मिळाला तरी त्याचा ५ वर्षेपर्यंत केव्हांहि उपयोग करतां येतो. शिवाय या अवधींत आपणाला विदेशी यात्रा करणें जमलें नाहीं तरी काळजी करण्याचें कारण नाहीं; तोच पासपोर्ट पुन्हा पुढच्या ५ वर्षांकरितां नवीन (Renew) करून घेतां येतो; एवढेंच कीं, पुनः तो पासपोर्ट-ऑफिसरकडे पाठवावा लागतो. नवीनीकरण करून घेतांना सुरुवातीसारखी धांवपळ मात्र करावी लागत नाहीं व विशेष उशीरहि लागत नाहीं.

### एक्स्चेंज-परमिट

पासपोर्टनंतर "एक्स्चेंज-परमिट" मिळविणें हें दुसरें महत्त्वाचें काम. वर्तमान कायद्याप्रमाणें भारताबाहेर जाणाऱ्या प्रवाशाला १३५ रु. व १० पौंडांच्या नोटा यापेक्षा अधिक रकम बरोबर नेतां येत नाहीं; यापेक्षा जास्त रकम सोबत नेण्याकरितां किंवा परदेशांत पोहोंचल्यानंतर भारतांतून मागविण्याकरितां एक्स्चेंज-परमिट काढणें आवश्यक आहे. पासपोर्ट मिळविण्यापेक्षाहि एक्स्चेंज-परमिट मिळविणें अधिक त्रासाचें आहे. कारण अलीकडे एक्स्चेंज-परमिट देण्याच्या बाबतींत भारत सरकारनें अत्यंत कडक धोरण स्वीकारलें आहे. एक्स्चेंज-परमिट मिळविण्यासाठीं आपल्या क्षेत्रांतील रिझर्व्ह बँकेच्या शाखेकडे अर्ज करावा लागतो; तेथून आपणाला एक फार्म येतो; तो भरून परत रिझर्व्ह बँकेच्या त्या शाखेकडे पाठवावा. तेथून तो रिझर्व्ह बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यांत येतो आणि तेथेंच तुम्हांला एक्स्चेंज-परमिट द्यावयाचें किंवा नाहीं हें ठरविलें जातें. या कामांतहि बहुधा उशीरच लागतो; तेव्हां यासाठींहि लौकरच अर्ज केलेला बरा; पासपोर्टसाठीं पाठवावयाच्या अर्जाइतका लौकर पाठविण्याची मात्र आवश्यकता नसते.

### हेल्थ सर्टिफिकेट

एक्सचेंज-परमिट मिळविल्यानंतर मिळवावयाचें राहिलेलें महत्त्वाचें सर्टिफिकेट म्हणजे "हेल्थ सर्टिफिकेट". यावांचून आपण बोटींत पाय सुद्धां ठेवूं शकणार नाहीं. हें हेल्थ सर्टिफिकेट इतर कोणताहि डॉक्टर देऊं शकत नाहीं; तें फक्त सरकारी किंवा म्युनिसिपल डॉक्टरच देऊं शकतात. म्युनिसिपल बोर्डाकडून देखील तें मिळवितां येतें. हें एका ठराविक फॉर्मवरच दिलें जातें व त्याला "इंटरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट" म्हणतात. हे फॉर्म बहुधा सर्व सरकारमान्य डॉक्टर आणि म्युनिसिपल बोर्डाकडे असले तरी त्यांच्यावर एक विशिष्ट शिक्का लागल्यानंतरच त्यांना मान्यता प्राप्त होते. भारत सोडण्यापूर्वी सुमारें दोन महिने याकडे लक्ष दिलें पाहिजे. हें इंटरनॅशनल सर्टिफिकेट मिळविण्याकरितां प्रथम "देवीची" आणि साधारणपणें एक आठवड्यानंतर "कॉलऱ्याची" लस टोंचून घ्यावी लागते. कॉलऱ्याची लस एक आठवड्याच्या अंतरानें दोनदां टोंचून घ्यावयाची असते. पहिल्यांदा टोंचून घेतलेली लस आठवड्यानंतरच्या तपासणींत परिणामकारक झाली नसल्याचें आढळून आल्यास डॉक्टर पुन्हा लस टोंचील व त्यानंतरच आपल्या सर्टिफिकेटवर इंटरनॅशनल मान्यतेचा शिक्का लागेल. सर्टिफिकेटवर लस टोंचल्याची तारीख, पॅकिंग, नंबर, औषधाची मात्रा आणि त्याचा शरीरावर प्रभाव या सर्व गोष्टींचा तपशीलवार उल्लेख असतो. यापैकीं एखाद्याहि गोष्टीच्या अभावीं आपलें सर्टिफिकेट अमान्य होण्याची शक्यता असते. आपणाला आफ्रिकेंत जावयाचें असल्यास कॉलरा व देवीच्या लसेव्यतिरिक्त "यलो फिव्हर" चीहि लस टोंचून घ्यावी लागेल. ही लस टोंचून घेण्याचीं भारतांत फक्त ४ किंवा ५ केंद्रें आहेत. इंटरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट मिळविण्याकरितां व लस टोंचून घेण्याकरितां कोणत्याहि प्रकारची फी लागत नाहीं

आणि म्हणूनच टॅक्स टॅचून घेण्याकरितां त्रास पडण्याची शक्यता असते.

### इन्कम टॅक्स क्लीअरन्स सर्टिफिकेट

या सर्व सर्टिफिकेटांव्यतिरिक्त आणखी दोन सर्टिफिकेटें आपणाला मिळवावयाचीं असतात. पण त्याकरितां कांहीं त्रास पडत नाहीं. यापैकी पहिलें इन्कम टॅक्स क्लीअरन्स सर्टिफिकेट होय. तें मिळविण्याकरितां आपणाला आपल्या शहरांतील इन्कम टॅक्स ऑफिसरकडे एक अर्ज पाठवावा लागतो. आपण जर इन्कम-टॅक्स देण्यापासून मुक्त असाल तर २-४ दिवसांतच हें सर्टिफिकेट मिळेल. इन्कमटॅक्स भरत असल्यास आणि आपलें नांव त्या कार्यालयांत नोंदलेलें असल्यास मात्र हें सर्टिफिकेट मिळविण्याकरितां उशीर लागण्याचा संभव असतो. तेव्हां या बाबतींत आधीपासूनच आपला हिशोब बिनचूक ठेवावा लागतो. आपल्या शहरांतून इन्कमटॅक्स मुक्तीचें सर्टिफिकेट मिळालें की आपली सुटका झाली असें मात्र समजूं नये, येथून सर्टिफिकेट घेऊन तें फॉरेन-सेक्शन (विदेश विभाग), मुंबईला पाठवावें लागेल व त्यानंतर तेथून आपणांला फॉर्म नं. "सी" वर एक दुसरेंच सर्टिफिकेट मिळेल आणि तेंच मान्य केलें जाईल. एवढें खरें कीं या सर्टिफिकिटाकरितां काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या शहरांतील इन्कम टॅक्स ऑफिसचें सर्टिफिकेट घेऊन तें आपल्या बोटीच्या कंपनीला पाठवावें; तेच पुढील सर्व काम उरकून घेतात. या कामाकरितां ते आपल्याकडून दक्षिणा मात्र घेणार नाहींत.

"इन्कम टॅक्स-मुक्ती" च्या या सर्टिफिकेटची मान्यता तें मिळाल्या तारखेपासून फक्त एक महिन्यापुरतीच असते. तेव्हां प्रयाणाची नक्की तारीख ठरल्यानंतर त्यापूर्वींच्या २०-२५ तारखेचेंच सर्टिफिकेट मिळवावयाला पाहिजे.

### नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट

हें शेवटचें सर्टिफिकेट होय. हें मिळविण्याकरितां कसलाहि त्रास पडत नसून अर्ज केल्यानंतर १०-१५ मिनिटांत सुद्धां तें मिळूं शकतें. भारताची सीमा ज्या शहरापासून आपण सोडतां त्या शहरींच साधारणपणें हें मिळतें. या सर्टिफिकेटच्या मान्यतेची मुदत ६ महिने असते. सहा महिन्यांनंतर पुन्हा दुसरें सर्टिफिकेट घ्यावें लागतें. विद्यार्थी म्हणून जे विदेशयात्रेला जातात त्यांना हें "नो आब्जेक्शन सर्टिफिकेट" घ्यावें लागत नाहीं. त्यांच्या पासपोर्टमध्यें मात्र ते विद्यार्थी असल्याची नोंद असणें आवश्यक आहे.

इंटरनॅशनल हेल्थ सर्टिफिकेट, नो आब्जेक्शन सर्टिफिकेट, इंकम टॅक्स क्लीअरन्स सर्टिफिकेट आणि एक्सचेंज परमिट, यांसाठी कोणत्याहि प्रकारची फी लागत नाहीं.

### सर्टिफिकिटांचें महत्त्व

एक्सचेंज परमिटव्यतिरिक्त इतर कोणत्याहि सर्टिफिकिटाभावीं भारताची सीमा ओलांडणें अशक्य आहे. आपणाला बोटीवर पाय ठेवतां येणार नाहीं कीं स्थलमार्गानें पाऊल पुढें टाकतां येणार नाहीं. वेळीं एक्सचेंज परमिट न मिळाल्यास मात्र विदेश-यात्रा करतां येते.

"उद्यम", ऑक्टोबर, १९५९

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १)

### को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा : सप्टेंबर १९५९ चा रिझल्ट

(२४ वा शिक्षण वर्ग)

खालील विद्यार्थी परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत:—

पहिला वर्ग:—एस. जी. मराठे.

दुसरा वर्ग:—एस. जी. दाते, व्ही. व्ही. कुलकर्णी, एन. एम. कांगणे, एम. एच. मकानदार, व्ही. एन. माणेकरी, आर. के. पाटील, एम. एस. साघले, एन. के. देशपांडे, ए. जी. ओंबळे.

तिसरा वर्ग:—डी. टी. जाधव, आर. बी. कुलकर्णी, सैय्यद् अझिमुद्दिन, एम. जी. मानारकर, पी. व्ही. बुलाख, बी. एम. एकबोटे, एम. पी. कामत, पी. आर. कुलकर्णी, व्ही. एन. भनगोळी, जी. व्ही. पटवर्धन, एस. बी. यंदे, व्ही.बी.बन्ने, के. बी भेगडे, एन. बी. चौगुले, बी. एस. दळवी, एस. के. घरम, व्ही. जी. गोसावी, एम. आर. गुणे, ए. एम. गुरव, बी. जी. जाधव, डी. के. जमदाडे, व्ही. जी. केसकर, पी. पी. कोष्टी, जी. जी. कुलकर्णी, जी. पी. माने, डी. बी. मोहिते, एम. आर. पाटील, एस. एस. रानवडे, एस. टी. रोकडे, वाय. एन. शंकर, एम. एन. शेवाळे, डी. एल. शिंदे, एच. बी. शिंदे, के. जी. शिंदे, एस. डी. थोरात, एम. के. ऊनऊने, एस. बी. वांद्रे, सूर्याजी रावसाहेब यादव, व्ही. एस. देशमुख, श्रीकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी, ए. एच. पाटील, सुदाम रामचंद्र यादव, एम. बी. आरोटे, पी. आर. दप्तरदार, बी. एस. जाधव, एन. व्ही. जोग, के. डी. कुलकर्णी, बी. पी. पाटील, टी. डी. पाटील, डी. आर. राऊत, एस. व्ही. सहस्रबुद्धे, आर. पी. सनेर, एन. आर. शाळीग्राम, एम. एस. शमशापुरे, एन. एस. सोनार.

टीप:—पुढील विद्यार्थ्यांनीं अनुक्रमें पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाचें पारितोषिक मिळविलें आहे:—

| पारितोषिकाचें नांव | विद्यार्थ्याचा नं. व नांव | बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|
| (१) सर जनार्दन ए. मदन पारितोषिक:— | क्र. पी-२२ श्री. एस. जी. मराठे | रु. २५ |
| (२) बॉम्बे को-ऑप. इन्शुअरन्स सोसायटी पारितोषिक:— | क्र. पी-४५ श्री. एम. एच. मकानदार | रु. १५ |

एम. व्ही. मद्दाने,
प्रिन्सिपॉल.

### भारतांतील परदेशीयांची नोंद

भारतांत वास्तव्य करीत असलेल्यांची नोंद झालेले ९५,१०४ परदेशीय आहेत. त्यांपैकी ११,९४२ चिनी आहेत. तथापि, एकट्या कलकत्त्यांतच नोंद न झालेले ३०,००० चिनी असावेत, असें पं. नेहरूंनीच सांगितलें आहे. नोंदलेले तिबेटी १०,२३३ आहेत. इतर प्रमुख देशीयांची नोंद अशी आहे:-७,०९५ अफगाण, ४,२१०, इराणी, ४,११९ अमेरिकन, ३,५९७ जर्मन, २,२२९ रशियन, १,७२८ बर्मी, १,०२९ फ्रेंच आणि १,०५५ इटालियन.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.